# जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये बार्शीच्या जेएसपीएमच्या बीआयटीचे यश

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरिय विवीध स्पर्धेमध्ये जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ ( जेएसपीएम ), पुणे या समुहाचे बार्शी येथील भगवंत इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ( बीआयटी ) या डिग्री व डिप्लोमा इंजिनिअरिंग महाविद्दालयातील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

स्टुंडंट ऑलिम्पिक असोशियेशन सोलापूर यांनी बार्शी येथे जिल्हास्तरिय विवीध स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धा दिनांक १० सप्टेंबर २०१६ रोजी बार्शी येथील शिवशक्ती मैदान येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये  जेएसपीएमच्या भगवंत इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ( बीआयटी ) या बार्शीतील डिग्री व डिप्लोमा इंजिनिअरिंग महाविद्दालयातील विद्यार्थ्यांनी विवीध स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले. यामध्ये व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक (मुली) वयोगट २२ मध्ये अमरजा देशमुख-कर्णधार, प्रतिक्षा ताकभाते, वैष्णवी सोनार, पूजा जगताप, विद्या रोडगे, अमृता पाटील, सारीका कुटे, अनामिका भांगे यांनी सुवर्ण पदक पटकाविले. बास्केटबॉल मध्ये प्रथम क्रमांक (मुले) वयोगट २८ मध्ये वैभव कश्यप-कर्णधार, शशांक शेटे, हर्षद मोरे, शोएब नाइकवाडी, शिराज शेख, सुरज कोरके, सागर तातेड, विपुल लोमटे, विशाल गरड, सागर नाईकनवरे, अमित आवताडे या संघाने सुवर्ण पदक जिंकले. बॅडमिंटन स्पर्धेमध्ये शशांक शेटे या विद्यार्थ्याने दोन सिल्व्हर व एक ब्राँझ असे एकून तीन पदके जिंकली आणि स्वरूप राऊत याने सिल्व्हर मेडल जिंकले. तसेच लॉन टेनीस या स्पर्धे मध्ये राहुल ढाळे याने गोल्ड मेडल जिंकत प्रथम क्रमांक मिळविला. याबरोबरच उस्मानाबाद येथे दिनांक २३, २४ सप्टेंबर २०१६ होणा-या जिल्हास्तरिय स्पर्धे साठी वरिल सर्व संघाची निवड करण्यात आली.

या मिळालेल्या घवघवीत याशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जेएसपीएम, पुणे समुहाच्या भगवंत इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ( बीआयटी ) बार्शीचे मा. अध्यक्ष तानाजीराव सावंत, तसेच जेएसपीएम पुणेचे मा. अध्यक्ष प्रा. शिवाजीराव सावंत व भगवंत इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ( बीआयटी ) बार्शीचे मा. सचिव पृथ्वीराज सावंत यांनी कौतुक केले. या यशाच्या मानकरी ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य प्रा. डॉ. अनिल देशमाने यांनी अभिनंदन केले. सर्व विभाग प्रमुख व प्राध्यापक तसेच सर्व कर्मचारीवर्ग यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. सर्व विद्यार्थ्यांना क्रिडाप्रमुख प्रा. खंडू चव्हाण यांचे मार्गदर्शन मिळाले.


Office


Wi - Fi
Office